नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंतर्गत लेखापरीक्षा व अंतर्गत नियंत्रण प्रणालीबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- तांनिअ-२०१८/प्र.क्र.५३/नवि-३१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १२ एप्रिल, २०१९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकांमधील आर्थिक अनियमिततांना आळा घालण्यासाठी अंतर्गत लेखापरीक्षण करणे व त्याचा अहवाल स्थायी समितीस सादर करणे याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या अंतर्गत लेखापरीक्षणाबाबतच्या तरतुदीची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याची बाब भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २०१६-१७ च्या स्थानिक संस्था अहवालाद्वारे निदर्शनास आणली आहे. महानगरपालिकांमधील अंतर्गत नियंत्रण प्रणाली परिणामकारकपणे राबविली जाण्यासाठी याबाबतच्या अधिनियम तरतुदीचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर त्यासंदर्भात सर्व महानगरपालिकांना पुन:श्च सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०५ व १०६ आणि मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १३५ ते १३७ नुसार महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षाकाने महानगरपालिकेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करावे व त्याचा अहवाल महानगरपालिकेच्या स्थायी समितीस सादर करावा. या अहवालात महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने महानगरपालिकेच्या खर्च अथवा वसुलीबाबत कोणत्याही त्रुटी, लक्षणीय अनौचित्य अथवा अनियमितता आढळून आल्यास त्यावर त्यांनी त्यांच्या स्थायी समितीस सादर करावयाच्या अहवालात मत प्रदर्शन करणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. तरी देखील महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकांमार्फत या अंतर्गत लेखापरीक्षणाबाबतची व लेख्यांचे प्रमाणिकरण करण्याबाबतची कार्यवाही प्रभावीपणे होत नसल्याची बाब निदर्शनास आणली आहे. त्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिकांना **खालीलप्रमाणे पुन:श्च सक्त सूचना देण्यात येत आहेत.**

१) राज्यातील सर्व महानगरपालिकांनी महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडून लेख्यांचे प्रलंबित प्रमाणिकरण व लेखापरीक्षण तात्काळ पूर्ण करावे व अधिनियमातील तरतुदीनुसार असे लेखापरीक्षण अहवाल त्यांच्या विशिष्ट मत प्रदर्शनासह स्थायी समितीस सादर करण्याची कार्यवाही करावी.

२) राज्यातील सर्व महानगरपालिकांना अशा सक्त सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या महानगरपालिकेचे यापूर्वीच्या ज्या वर्षांचे लेखापरीक्षण अपूर्ण राहिलेले आहेत ती कार्यवाही पुढील ३ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावी व सन २०१७-१८ पर्यंतच्या लेख्यांचे लेखापरीक्षण पूर्ण करुन त्यावरील अधिनियमातील तरतुदीनुसार संस्करणाची संपूर्ण कार्यवाही पुढील ३ महिन्यात निश्चितपणे पूर्ण करावी. ही कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी पूर्णत: संबंधित महानगरपालिका आयुक्त व संबंधित मुख्य लेखापरीक्षक यांची राहील.

३) त्याचप्रमाणे सन २०१८-१९ या वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन त्याबाबतचा अहवाल स्थायी समितीस सादर करण्यासंदर्भातील कार्यवाही अधिनियमातील तरतुदीनुसार विहीत कालमर्यादेत पूर्ण करावी.

४) पुढील कोणत्याही वर्षामध्ये महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार अशा अंतर्गत लेखापरीक्षणाबाबतची कार्यवाही प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व संबंधित मुख्य लेखापरीक्षक यांची राहील.

५) या परिपत्रकानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती सोबतच्या नमुन्यात पुढील ३ महिन्यात शासनाकडे सादर करावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४१२१७०९५१०५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang
Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.04.12 17:37:42 +05'30'

(पां. जो. जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री नगरविकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

६. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.

७. विभागीय आयुक्त, (सर्व)

८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

९. जिल्हाधिकारी (सर्व)

१०. सह सचिव (नवि-२१/२२/२६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. ११. सह सचिव (नवि-२४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. १२. उप सचिव (नवि-२३/२५) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. १३. उप सचिव (नवि-१८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. १४. उप सचिव (नवि-१९/२८) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.	त्यांनी त्यांच्या अधिनस्त महानगरपालिकांची सोबतच्या विवरणपत्रातील माहिती संकलित करुन पुढील कार्यवाही करावी.

१५. निवड नस्ती, नवि-३१.

शासन परिपत्रक क्र. तांनिअ-२०१८७/प्र.क्र.५३/नवि-३१, दिनांक १२ एप्रिल, २०१९ चे सोबतचे **सहपत्र**

महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार अंतर्गत लेखापरीक्षणाबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती

अ.क्र.	आर्थिक वर्ष	अंतर्गत लेखापरीक्षणाची कार्यवाही पूर्ण झाली आहे किंवा कसे? असल्यास केव्हा पूर्ण झाली	लेखापरीक्षण अहवाल स्थायी समितीस सादर झाला आहे किंवा कसे असल्यास केव्हा
१	सन २०११-१२		
२	सन २०१२-१३		
३	सन २०१३-१४		
४	सन २०१४-१५		
५	सन २०१५-१६		
६	सन २०१६-१७		
७	सन २०१७-१८		
८	सन २०१८-१९		

मुख्य लेखापरीक्षक, **आयुक्त,**

-------------- महानगरपालिका -------------- महानगरपालिका